श्री सिध्दिविनायक

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.
दूरध्वनी : ०२२ - ६२४९ ११११ / ११२
ईमेल : admin@siddhivinayak.org I info@siddhivinayak.org
वेबसाईट : www.siddhivinayak.org

## प्रथम मुदतवाढ

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात ''श्री'' ची गणेश मुर्ती पुरवठा करण्याबाबत.**
**कालावधी**
**सन २०२६ – २०२७ वर्षभराकरिता**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात ''श्री'' ची गणेश मुर्ती पुरवठा करण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित पध्दतीने मोहरबंद दरपत्रके मागविण्यात आली होती त्यात एकही दरपत्रक धारकाने सहभाग घतला नसल्यामुळे प्रथम मुदतवाढ येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : | गुरूवार, दि.१६.०४.२०२६ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | मंगळवार, दि.२१.०४.२०२६,सांय. ५ वाजेपर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | गुरूवार, दि.२३.०४.२०२६, दु. २ वाजता |

अटी व शर्ती :

१) मूळ दरपत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification) ''श्री'' ची गणेश मुर्ती खरेदी करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) आपण करीत असलेल्या ''श्री'' ची गणेश मुर्तीचा दर्जा उत्तम असावा.

३) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून ५० कि.मी च्या आत असणे आवश्यक आहे.

४) ''श्री'' ची गणेश मुर्ती न्यासाच्या खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करावयाचा आहे. साहित्यांच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

५) ''श्री'' ची गणेश मुर्तीचा कार्यादेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसात पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील. पुरवठा वेळेत न केल्यास किंवा ''श्री'' ची गणेश मुर्ती मध्ये तफावत आढळल्यास किंवा सदोष ''श्री'' ची गणेश मुर्तीचा पुरवठा केल्यास पुरवठादाराच्या देयकातून २०% रक्कम कपात करण्यात येईल. पुरवठाचे काम पूर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलामध्ये पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बॅकेचा तपशील नमूद करणे.

६) सदर दरपत्रकधारक हा हिंदु असावा.

७) जी एस टी क्रमांक लागू नसल्यास कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून दरपत्रकासोबत सादर करावे.

८) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकिंत करून सादर करावयाची कागदपत्रे :

लिफाफा–१

अ) कंपनी नोंदणीचा दाखला

ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी / ट्रेडिंग लायसन्स

क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

ड) ३ वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे सादर करावी. (कार्यादेश, पुरवठा आदेश,बिलाच्या प्रती यापैकी एक)

इ) मागील ३ वर्षाची सरासरी वार्षीक उलाढाल किमान ५ लक्ष असावी

लिफाफा –२

अ) मूल्य दरपत्रक

९) दरपत्रकधारकाने A ४ साईज लिफाफा मध्ये तांत्रिक दरपत्रक व मुल्य दरपत्रक तपशिल याप्रमाणे दोन वेगवेगळया लिफाफामध्ये भरुन त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक त्यावर लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

१०) दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्विकृत दर अखेर पर्यंत कायम राहतील. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

११) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

१२) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१३) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१४) ''श्री'' ची गणेश मुर्ती संबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९११६० वर संपर्क साधावा.

१५) ''श्री'' ची गणेश मुर्ती पुरवठा कालावधी समाप्त झाल्यास, पुढील मोहरबंद दरपत्रके किंवा याबाबतची ई– निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ''श्री'' ची गणेश मुर्तीचा पुरवठा दरपत्रकान्वये सादर केलेल्या दरानुसार न्यासास करणे आवश्यक राहिल.

१६) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

Vpatil

(वीणा पाटील)

कार्यकारी अधिकारी